तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१७/८४९२

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांकः- दि. २९/११/२०१७

प्रति

अध्यक्ष/सचिव,

सिंधू एज्युकेशन सोसायटी, प्रॉपर्टी नं ७६/३, वार्ड नं ५, बावधन बु., ता मुळशी, जि. पुणे

विषय - सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेंचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत....

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.

३. शासन निर्णय एसएफएस-२०१७/प्र.क्र.६९२/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ दि १३.११.२०१७

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता विद्यमान शाळेंचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक [illegible] नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेंचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | सिंधू एज्युकेशन सोसायटी, प्रॉपर्टी नं ७६/३, वार्ड नं ५, बावधन बु., ता मुळशी, जि पुणे | युरेका इंटरनॅशनल स्कूल, धायरी, सिंहगड रोड, ता हवेली, जि पुणे | इंग्रजी | नविन शाळा (सी बी एस इ) | प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ १ ली ते १२ वी, सर्व शाखा | २०१७-१८ |

अटी व शर्ती :-

१ शासन निर्णयातील अट क्र. १ नुसार सदर शाळेच्या प्रस्तावित ठिकाणाचा संस्थेच्या मालकीचा विहित निकषाप्रमाणे जमिनीचा ७/१२ चा अद्ययावत उतारा, खरेदीखत किंवा ३० वर्ष कालावधीच्या नोंदणीकृत भाडेकराराची प्रत विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे तात्काळ सादर करणे आवश्यक आहे. सदर माहिती सादर न केल्यास शाळेची मान्यता आपोआप रदद होईल.

२ सदर शाळेला बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक आहे

३ पात्र ठरलेल्या संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

४. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासुन एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत

५ ज्या व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील

७ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

८ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द झाल्याचे समजण्यात येईल

९. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी** संबंधित संस्थेवर राहील याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना [illegible] येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील

१० परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

(दिनकर टेमकर )

शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. स्वा म नानक, उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

सत्यप्रत

शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग, पुणे-४११ ००१

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे,तसेच,विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.६९२/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १३ नोव्हेंबर, २०१७

प्रस्तावना -

१. सिंधू एज्युकेशन सोसायटी, प्रॉपर्टी नं. ७६/३, वॉर्ड नं. ५, बावधन बु., ता.मुळशी, जि.पुणे संचलित युरेका इंटरनॅशनल स्कूल, धायरी सिंहगड रोड, ता.हवेली, जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत सिंधू एज्युकेशन सोसायटी, प्रॉपर्टी नं. ७६/३, वॉर्ड नं. ५, बावधन बु., ता.मुळशी, जि.पुणे संचलित युरेका इंटरनॅशनल स्कूल, धायरी सिंहगड रोड, ता.हवेली, जि.पुणे ही नवीन शाळा (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर संस्थेने शाळेच्या प्रस्तावित ठिकाणचा संस्थेच्या मालकीचा विहित निकषाएवढ्या जमिनीचा ७/१२ चा अद्ययावत उतारा/खरेदीखत किंवा ३० वर्षे कालावधीच्या नोंदणीकृत भाडेकराराची प्रत विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे तात्काळ सादर करणे आवश्यक आहे.

(२) सदर शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९मधील तरतुदींची व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९**मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्याआत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब)व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातलठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसारसी.**बी.एस.ई. मंडळाशी संलग्नेतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.)मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नताना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत** (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii)महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२(सन २०१३ चा ०१)मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.

(७) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा** / दर्जावाढशाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित

केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढपरवानगी प्राप्त शाळा"असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(स्वा.म.नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जि.प. पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/63/2019**
**पुणे 1 दिनांक :- 18/1/2019**

**प्रति,**

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**
**सिंधु एज्युकेशन सोसायटी प्रॉपटी नं 76/3 वॉर्ड नं 5 बावधन बु ता मुळशी जि पुणे संचलित युरेका इंटरनॅशनल स्कूल धायरी सिंहगड ता हवेली जिल्हा पुणे**

विषय:- सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत

संदर्भ 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र 1, 6 व 24) 2013
2. शासन निर्णय क्रमांक एसएफएस 1017 प्र क्र 692 एसएम 2 दिनांक 13/11/2017
3.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे यांचे जा.क्र.शिउस /पुवी 2017

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तीवर विद्यमान प्राथमिक शाळेस प्राथ ते उच्चप्राथमिक इ. 1 ली ते इ. 8 वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे .**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नोव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 9 |
| 1 | सिंधु एज्युकेशन सोसायटी प्रॉपटी नं 76/3 वॉर्ड नं 5 बावधन बु ता मुळशी जि पुणे | युरेका इंटरनॅशनल स्कूल धायरी सिंहगड ता हवेली जिल्हा पुणे | इंग्रजी | नविन शाळा (सी.बी.एस.ई ) | प्राथमिक ते उच्च प्राथमिक इ 1 ली ते इ.8 वी | 2017-18 |

**अटी व शर्ती**

1.संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

2.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

3.या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.

4.संदर्भ क्रमांक 02 अन्वयेसन 2017-18 मध्ये नविन शाळा परवान[illegible]येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठर[illegible]

5.परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित हो[illegible]शाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

6 शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

7..महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

8 महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **UDISE** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

9. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**
**1)मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई-32.**
**2)मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1**
**3)मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1.**

पुणे जिल्हा परिषद, पुणे
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा-/165/2019
दिनांक- 14/ 2 /2019

प्रति,
मा. शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे

विषय:- नाहरकत प्रमाण बाबत
संदर्भ :- शासन निर्णय एसएफएस 1017 प्र क्र 692 एसएम -2
दिनांक 13/11/2017

महोदय,

उपरोकत संदर्भीय विषयास अनुसरुन सादरकरण्यात येते की युरेका इंटरनॅशनल स्कूल धायरी सिंहगड ता हवेली जिल्हा पुणे या शाळेस (सी.बी.एस.ई /राज्यमंडळ) नाहरकत प्रमाणपत्र या कार्यालयास संलग्नेसाठी प्रस्ताव प्राप्त् झाला आहे .सदर शाळेचा प्रस्ताव मान्यता प्रमाणपत्रा जोडून पुढील कार्यवाहीस्त्व आपल्या कार्यालयास शिफारशीसह सादर करणेत येत आहे . कृपया स्विकार व्हावा ही विनंती .

आपला विश्वासू

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

प्रत:- माहितीसाठी व कार्यवाहीस्त्व
अवर सचिव महाराष्ट्र शासन

परवानगी वर्ष :-२०१७-२०१८
माध्यम : इंग्रजी
**स्वयंअर्थ सहाय्यित शाळा**
(माध्यमिक) (C.B.S.E.)

जा.क.शिउसं/माध्य-३०२/प्र.मा. नवीन शाळा/पुवि/२०१९ 1332e
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : 25 APR 2019

**प्रति,**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**विषय : सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच नवीन (C.B.S.E.) शाळे साठी जून-२०१८ पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर प्रथम मान्यता देण्याबाबत. सिंधु एज्युकेशन सोसायटी, प्रॉपर्टी नं. ७६/३,वॉर्ड नं.५,बावधन बु, ता.मुळशी,जि.पुणे संचलित युरेका इंटरनॅशनल स्कूल,धायरी सिंहगड रोड, ता.हवेली जि.पुणे**

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र) असाधारण क्र. १,६,२४) २०१३
२.शालेय शिक्षण विभाग, मुंबई कडील शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१७/प्र.क्र.६९२ एसएम-२ दिनांक १३.११.२०१७
३. या कार्यालयाचे पत्र क्रं.शिउसं /माध्य-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१७ ८४९२,, दिनांक २१.११.२०१७
४. आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र.जि.प./शिक्षण/माध्य/सांक्र/२०१९/२१०५,,दिनांक ९.४.२०१९

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये **सिंधु एज्युकेशन सोसायटी, प्रॉपर्टी नं. ७६/३,वॉर्ड नं.५,बावधन बु, ता.मुळशी,जि.पुणे संचलित युरेका इंटरनॅशनल स्कूल,धायरी सिंहगड रोड, ता.हवेली जि.पुणे** या नवीन माध्यमिक शाळेच्या इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत च्या इंग्रजी माध्यम वर्गासाठी (प्राथमिक ते उच्च माध्यमिक) सर्व शाखा (C.B.S.E.) जुन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी जून २०१७ पासून शालेय शिक्षण विभाग,मुंबई कडील संदर्भीय क्र. २ चे शासन निर्णयानुसार स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर परवानगी मिळालेली आहे. तदनंतर या कार्यालयाने संदर्भीय पत्र क्र. ३ नुसार नवीन शाळा (C.B.S.E.) (प्राथमिक ते उच्च माध्यमिक) इ. १ ली ते १२ वी पर्यंतच्या इंग्रजी माध्यम वर्गासाठी स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सन २०१७-२०१८ पासून परवानगी दिलेली आहे. **आता** आपली संदर्भीय पत्र क्र. ४ अन्वये स्पष्ट शिफारस विचारात घेता **नवीन इंग्रजी माध्यमिक शाळेसाठी इ. ९ वी व इ. १० वी (C.B.S.E.) सन २०१८-२०१९ पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२.नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
३.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे
४.विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती [illegible]
५.संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्या[illegible]
६.शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकार[illegible]ण्यात यावी.
७.विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
८.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
९.सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.
१०.संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
११.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
१२.अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **२०१७-२०१८** पासून असेल
१३.शैक्षणिक वर्ष **२०१७-२०१८** मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत
१४.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अथसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य - अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
१५ शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र इंग्रजी नवीन माध्यमिक शाळा / वर्ग (C.B.S.E.) असे** दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

१६. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

१७. महाराष्ट्र स्वंयअथसहय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **U- Dise** मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील

१८. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**इतर अटी :**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी

१.शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येंवू नयेत

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबांबत आवश्यकते प्रशिक्षण देण्यात यावे.

सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.

१.प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेला निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.**

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

(मिनाक्षी राऊत )
**प्र. शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग पुणे-१.**

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
**१. मुख्याध्यापक, युरेका इंटरनॅशनल स्कूल,धायरी सिंहगड रोड, ता.हवेली जि.पुणे**
२. विभागीय सचिव,पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे
३. अध्यक्ष/सचिव, **सिंधु एज्युकेशन सोसायटी, प्रॉपर्टी नं. ७६ [illegible],बावधन बु, ता.मुळशी,जि.पुणे**
**प्रत : माहितीसाठी सविनय सादर**
१.मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.
२.निवडनस्ती.